नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक:१२/०६/२०२६

**पुणे महानगरपालिका**
**मा. स्थायी समिती**
**कार्यपत्रिका क्र.१२**

मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार, दि.१६/०६/२०२६ रोजी, सकाळी ११:३० (अकरा वाजून तीस मिनिटे)** वाजता मा.स्थायी समिती सभागृह , दुसरा मजला, पुणे महानगरपालिका ( नवीन विस्तारित इमारत ) येथे भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

उपायुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र.२६२**

उप आयुक्त परिमंडळ क्र.५ कार्यालयाचे नियंत्रणखालील क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्यांबाबतचा माहे एप्रिल २०२६ चा एकत्रित अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति. महापालिका आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/परि.५/१६० दिनांक ०९/०६/२०२६ रोजीचे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र.२६३**
**मा. हर्षदा शंतनु भोसले यांचे दि.०८/०६/२०२६ चे पत्र.**

प्रभाग क्र. ३२ अ मधील खालील कामांसाठी रु.९०,००,००० ( नव्वद लक्ष )लाखांचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| यादी क्र.SA2<br>शहरामधील रस्ते विकसित करणे आणि डांबरीकरण करणे<br>CE20A102/SA2<br>व<br>यादी क्र.SA15<br>शहरातील रस्ते कॉंक्रिटने विकसित करणे<br>CE20A1262/SA15 | | |
| १.प्र.क्र.३२ अ मध्ये, वारजे पॉप्युलरनगर अमर भारत परिसरात गल्ली नं.१ ते ५ रस्ता करणे.<br>( बजेट कोड CE20A102/SA2-3428 पान क्र. १७८ ) | ३०.०० लक्ष | --- |

| | | |
|---|---|---|
| २.प्र.क्र.३२ अ मध्ये, वारजे पॉप्युलर नगर मोतीराम नगर परिसरातील रस्ता करणे.<br>( बजेट कोड CE20A102/SA2-2914 पान क्र. १६९) | २०.०० लक्ष | --- |
| ३. प्र.क्र.३२ अ मध्ये, वारजे पॉप्युलर नगर शिवणे दांगट इंडस्ट्रीज परिसरात रस्ते करणे.<br>(बजेट कोड CE20A102/SA2-2915 पान क्र. १६९) | २०.०० लक्ष | --- |
| ४. प्र.क्र.३२ अ मध्ये वारजे पॉप्युलर नगर निर्मिती ते युनिव्हर्सल सोसायटी रस्ता कॉंक्रिट करणे.<br>(बजेट कोड CE20A1262/SA15-2078 पान क्र. १९८) | २०.०० लक्ष<br>--------<br>९०.०० लक्ष | --- |
| नवीन सुचविलेली कामे - | | |
| १. प्र.क्र.३२ अ मध्ये, वारजे पॉप्युलरनगर स.नं.२४ ते ३० मधील रस्ता विकसित करणे. | --- | ५०.०० लक्ष |
| २. प्र.क्र.३२ अ मध्ये, वारजे पॉप्युलरनगर कुस्ती संकुल शेजारील रस्ता विकसित करणे. | --- | ४०.०० लक्ष<br>----------<br>९०.०० लक्ष |

**विषय क्र.२६४**

**मा. हरिदास कृष्णा चरवड यांचे दि.०८/०६/२०२६ रोजीचे पत्र.**

प्रभाग क्रमांक ३४ मधील प्रेयेजा सिटी परिसरात विकास आराखड्यात (डी.पी.) प्रस्तावित असलेला रस्ता ओढ्यामुळे अपूर्ण राहिलेला आहे. परिणामी परिसरातील नागरिकांना दळणवळणासाठी पर्यायी व लांबच्या मार्गांचा वापर करावा लागत असून वाहतुकी संदर्भात मोठ्या प्रमाणात गैरसोय निर्माण होत आहे.

सदर ओढ्यावरील आवश्यक क्षमतेचा कल्व्हर्ट बांधण्यात आल्यास डी. पी. रस्त्याची सलगता निर्माण होऊन रस्ता पूर्णत्वास जाईल. तसेच परिसरातील वाहतूक अधिक सुलभ व सुरक्षित होईल. नागरिकांना शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, सार्वजनिक सुविधा तसेच मुख्य रस्त्यांशी जोडणी सुलभ होईल. आपत्कालीन सेवांनाही या मार्गाचा लाभ होणार आहे.

परिसरातील वाढती लोकसंख्या, नागरीकरण आणि भविष्यातील वाहतुकीची गरज लक्षात घेता सदर डी. पी. रस्ता पूर्ण करणे अत्यावश्यक आहे.

त्यामुळे प्रेयेजा सिटी परिसरातील ओढ्यावर आवश्यक तांत्रिक निकषांनुसार कल्व्हर्ट बांधण्यात यावा व त्याद्वारे विकास आराखड्यातील 7.5 m (डी. पी.) रस्ता पूर्ण करण्यासाठी आवश्यक प्रशसकीय मान्यता,निधी उपलब्ध व कार्यवाही तातडीने करण्यात यावी.

**विषय क्र.२६५**

**मा. महेश नानासाहेब वाबळे यांचे दि.०९/०६/२०२६ चे पत्र.**

मा स्थायी समिती ठराव क्र. १९४ दि.१४/०५/२०२६ अन्वये मान्य करण्यात आलेला ठराव रद्द करण्यात यावा.

**विषय क्र.२६६**

**मा. स्मिता सुधीर कोंढरे व मा. निलेश निकम - मा. विरोधी पक्षनेते यांचे दि.१०/०६/२०२६ चे पत्र.**

पुणे स्मार्ट सिटी प्रकल्पा अंतर्गत विकसित करण्यात आलेल्या जागा, उद्याने, क्रीडांगणे, इत्यादी गेल्या वर्षी पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरित केली गेली.

पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली उद्याने, क्रीडांगणे ही प्लेस मेकिंग अंतर्गत विकसित करण्यात आली. पुणे स्मार्ट सिटी प्रकल्पा अंतर्गत विकसित करण्यात आलेली जागा ही पुणे महानगरपालिकेने योग्य त्या खात्याकडे त्या त्या जागेची देखभाल दुरुस्ती व त्या जागेवरील नियंत्रण असणे करिता संबंधित खात्याकडे जबाबदारी निश्चित करणे आवश्यक होते,

परंतु तसे न झाल्यामुळे पुणे स्मार्ट सिटी प्रकल्पा अंतर्गत विकसित करण्यात आलेल्या जागा ह्या संबंधित खात्याने दायित्व न स्वीकारल्या कारणामुळे सदर जागांची देखभाल दुरुस्ती, देखरेख-नियंत्रण, व आवश्यक विकास कामे करता येत नाही.

त्यामुळे वरील सर्व बाबी विचारात घेता, पुणे स्मार्ट सिटी प्रकल्पा अंतर्गत विकसित करण्यात आलेल्या जागा, उद्याने, क्रीडांगणे, हे त्या त्या संबंधित खात्याकडे सदर जागांची देखभाल दुरुस्ती चे दायित्व देण्यात यावे. भवन रचना, उद्यान, क्रीडा विभाग, इत्यादी खात्याने संबंधित प्लेस मेकिंग अंतर्गत विकसित करण्यात आलेल्या जागा ताब्यात घेणे बाबत चे आवश्यक धोरण तयार करण्यात यावे. तसेच त्याकरिता आवश्यक निधी सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकातून उपलब्ध करण्यात यावा.

**विषय क्र.२६७**

**मा. हरिदास कृष्णा चरवड व मा. सचिन रावसाहेब मोरे यांचे दि.१०/०६/२०२६ चे पत्र.**

सिंहगड रोड हा पुणे शहराच्या पश्चिम भागाला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा व वर्दळीचा मार्ग आहे. वडगाव बुद्रुक, वडगाव खुर्द, धायरी, नन्हे, नांदेड गावठाण, नांदेड सिटी, खडकवासला तसेच आजूबाजूच्या विस्तृत परिसरातील लाखो नागरिक या मार्गाचा दैनंदिन वापर करतात. शैक्षणिक संस्था, रुग्णालये, सोसायट्या, व्यापारी आस्थापने, धार्मिक स्थळे तसेच महामार्गाशी जोडणारे मार्ग या परिसरात असल्याने वाहनांची व नागरिकांची सतत मोठ्या प्रमाणात वर्दळ असते.

सिंहगड रोडवरील राजाराम पूल ते फन टाईम थिएटर या दरम्यान उड्डाणपूल उभारण्यात आल्यामुळे मुख्य रस्त्यावरील वाहतुकीस मोठी सुविधा निर्माण झाली आहे. तथापि, या उड्डाणपुलामुळे राजाराम पूल ते वडगाव बुद्रुक या दिशेने येणाऱ्या वाहनांचा वेग वाढलेला असून, शरद हॉस्पिटल, महालक्ष्मी (टोंगोबा) मंदिर परिसर व फन टाईम थिएटरजवळील भागात वाहतुकीचा ताण वाढत आहे. या ठिकाणी मुख्य रस्ता, सेवा रस्ता, स्थानिक अंतर्गत रस्ते आणि कॅनॉललगतचा डी.पी. रस्ता यांची हालचाल एकत्र येत असल्याने वाहनांची गर्दी, वाहतूक कोंडी व अपघाताचा धोका निर्माण होतो.

पु. ल. देशपांडे उद्यानापासून कॅनॉललगत राजयोग सोसायटी, मधुकोश सोसायटीमार्गे वडगाव खुर्दपर्यंत साडेसात मीटरचा डी.पी. रस्ता विकसित करण्यात आलेला आहे. हा रस्ता महालक्ष्मी मंदिर

परिसर, राजयोग सोसायटी, मधुकोश सोसायटी, वसंत विहार सोसायटी, सुंदरवन सोसायटी, राजीव मधुकर सोसायटी, वडगाव खुर्द तसेच नांदेड गावठाण, नांदेड सिटी, नांदेड परिसर व खडकवासला भागातील नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त पर्यायी मार्ग ठरत आहे. मोठ्या संख्येने नागरिक याचा वापर करीत आहे.

परंतु सदर डी.पी. रस्ता शरद हॉस्पिटल / महालक्ष्मी (टोंगोबा) मंदिर परिसरात सिंहगड रोडला छेदत असल्यामुळे या पर्यायी रस्त्याचा पूर्ण क्षमतेने वापर होत नाही. नांदेड, खडकवासला, वडगाव खुर्द किंवा हायवेकडे जाणाऱ्या नागरिकांना पुन्हा मुख्य सिंहगड रोडवरील गर्दीतूनच प्रवास करावा लागतो. परिणामी मुख्य रस्त्यावर वाहतुकीचा ताण वाढतो, वेळेचा अपव्यय होतो आणि अपघाताचा धोका कायम राहतो. सदर फनटाईम थिएटर व शरद हॉस्पिटल चौक सिंहगड रोडखाली अंडरपास उभारण्यात आल्यास कॅनॉललगतच्या ७.५ मीटर डी.पी. रोडची प्रभावी व सुरक्षित जोडणी होईल. त्यामुळे पु. ल. देशपांडे उद्यान परिसरापासून महालक्ष्मी मंदिर, राजयोग सोसायटी, मधुकोश सोसायटी, वसंत विहार सोसायटी, सुंदरवन सोसायटी, राजीव मधुकर सोसायटी, वडगाव खुर्द, नांदेड गावठाण, नांदेड सिटी, नांदेड परिसर, खडकवासला तसेच हायवे परिसराकडे जाणाऱ्या नागरिकांना कमी गर्दीचा, सुरक्षित, जलद व पर्यायी मार्ग उपलब्ध होईल.

भविष्यात सिंहगड रोड मेट्रो प्रकल्पाचे काम सुरू झाल्यानंतर या भागातील वाहतूक व्यवस्थापन अधिक आव्हानात्मक होण्याची शक्यता आहे. मेट्रोच्या कामामुळे मुख्य रस्त्यावर तात्पुरती वाहतूक वळवणे, रस्त्याची उपलब्ध रुंदी कमी होणे, स्थानिक वाहतुकीचा ताण वाढणे अशा परिस्थिती निर्माण होऊ शकतात. त्यामुळे मेट्रो प्रकल्प सुरू होण्यापूर्वीच सिंहगड रोडला पर्यायी आणि समांतर मार्ग सक्षम करणे अत्यंत आवश्यक आहे.

शरद हॉस्पिटल / महालक्ष्मी (टोंगोबा) मंदिर परिसरातील प्रस्तावित अंडरपास हा तुलनेने कमी खर्चात होऊ शकणारा, परंतु दीर्घकालीन वाहतूक व्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा उपाय आहे. या अंडरपासमुळे मुख्य सिंहगड रोड, सेवा रस्ता, उड्डाणपूल आणि कॅनॉललगतचा डी.पी. रस्ता यांचे वाहतूक नियोजन अधिक प्रभावी होईल.

तसेच स्थानिक नागरिक, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, रुग्णालयात येणारे नागरिक, कामगार वर्ग व दैनंदिन प्रवासी यांना सुरक्षित व सोयीस्कर मार्ग उपलब्ध होईल.

या कामासाठी पुणे महानगरपालिकेच्या पथ विभाग, प्रकल्प विभाग, वाहतूक नियोजन विभाग, मेट्रो प्रकल्प विभाग तसेच संबंधित सर्व विभागांनी संयुक्त पाहणी करून तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्यता तपासणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी अंडरपासाची रुंदी, उंची, ड्रेनेज व्यवस्था, पावसाळी पाणी निचरा, पादचारी सुरक्षितता, प्रकाश व्यवस्था, वाहतूक चिन्हे, सेवा रस्त्याशी जोडणी तसेच आपत्कालीन वाहनांच्या हालचाली यांचा विचार करून सविस्तर आराखडा तयार करणे गरजेचे आहे.

सिंहगड रोड परिसरातील वाढते नागरीकरण, उड्डाणपुलामुळे बदललेली वाहतूक रचना, भविष्यातील मेट्रो प्रकल्प, नांदेड-खडकवासला भागातील वाढती लोकसंख्या आणि नागरिकांच्या दैनंदिन सोयीच्या दृष्टीने सदर अंडरपास प्रकल्प जनहिताचा, दूरदृष्टीचा आणि अत्यावश्यक आहे.

पुणे महानगरपालिकेच्या सिंहगड रोडवरील शरद हॉस्पिटल / महालक्ष्मी (टोंगोबा) मंदिर परिसरात, फन टाईम थिएटरजवळ कॅनॉललगत असलेल्या साडेसात मीटर डी.पी. रोडसाठी सिंहगड रोडखाली अंडरपास उभारण्याबाबत तातडीने तांत्रिक सर्वेक्षण करण्यात यावे,

सदर कामासाठी पथ विभाग, प्रकल्प विभाग, वाहतूक नियोजन विभाग, मेट्रो प्रकल्प विभाग, पावसाळी लाईन / ड्रेनेज विभाग तसेच संबंधित सर्व विभागांनी संयुक्त स्थळ पाहणी करून व्यवहार्यता अहवाल (Feasibility Report), सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR), अंदाजपत्रक व तांत्रिक आराखडा तयार करावा. सदर अंडरपासाचे नियोजन करताना वाहन वाहतूक, पादचारी सुरक्षा, पावसाळी पाणी निचरा, प्रकाश व्यवस्था, साइनबोर्ड, सेवा रस्त्याशी जोडणी, आपत्कालीन वाहनांची सोय तसेच भविष्यातील मेट्रो प्रकल्पाचा परिणाम यांचा सखोल विचार करण्यात यावा. या प्रकल्पासाठी आवश्यक निधीची तरतूद करून प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता व निविदा प्रक्रिया तातडीने राबविण्यात यावी.

सिंहगड रोड परिसरातील वाहतूक कोंडी कमी करणे, उड्डाणपूल व मुख्य रस्त्यावरील वाहतूक सुरळीत करणे, कॅनॉललगतच्या साडेसात मीटर डी.पी. रोडचा प्रभावी वापर करणे आणि पु. ल. देशपांडे उद्यान परिसरापासून वडगाव खुर्द, नांदेड, नांदेड सिटी, खडकवासला व हायवे परिसराकडे जाणाऱ्या नागरिकांना सुरक्षित पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे या जनहिताच्या उद्देशाने सदर अंडरपास प्रकल्पास मान्यता देण्यात यावी ही विंनती.

विषय क्र.२६८
**मा. महेश नानासाहेब वाबळे यांचे दि.१०/०६/२०२६ चे पत्र.**
प्रभाग क्र.३६ ड मध्ये विविध विकास कामे करणे करिता खालील प्रमाणे र.रु. १० लक्षांचे वर्गीकरण करून मिळणेबाबत.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| १.पुणे मनपा सन २०२६-२७ अंदाजपत्रक बजेट कोड CE20A1262/SA15-2141 प्रभाग क्र. ३६ ड मध्ये अध्यापक ग्राउंड लागतच रस्ता कॉंक्रीट करणे | १० लक्ष | |
| <u>नवीन सुचविलेले काम</u> | | |
| १) प्रभाग क्र.३६ड मध्ये अध्यापक ग्राउंड लागतच रस्ते डांबरीकरण करणे. | | १० लक्ष |
| एकूण | | १० लक्ष |

विषय क्र.२६९
**मा. महेश नानासाहेब वाबळे यांचे दि.१०/०६/२०२६ चे पत्र.**
प्रभाग क्र.३६ ड मध्ये विविध विकास कामे करणे करिता खालील प्रमाणे र.रु. ४० लक्षांचे वर्गीकरण करून मिळणेबाबत.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| १.पुणे मनपा सन २०२६-२७ अंदाजपत्रक बजेट कोड CE20A1262/SA15-2555 प्रभाग क्र. ३६ ड मध्ये पुजा नर्सिंग होम | ४० लक्ष | |

| | | |
|---|---|---|
| येथील रस्ता कॉंक्रीट करणे | | |
| नवीन सुचविलेले काम | | |
| १) प्रभाग क्र.३६ड मध्ये तळजाईपठार परिसरातील विविध रस्ते डांबरीकरण करणे. | | २० लक्ष |
| २. प्रभाग क्र.३६ ड मध्ये सहकारनगर २ मध्ये व विविध ठिकाणी रस्ते विषयक कामे व फुटपाथ दुरुस्ती करणे. | | २० लक्ष |
| एकूण | | ४० लक्ष |

**विषय क्र.२७०**

**मा. श्वेता सचिन घुले व मा.प्राची आशिष अल्हाट यांचे दि.१०/०६/२०२६ चे पत्र.**

प्रभाग क्र.४१ क मधील खालील कामांसाठी रुपये २,००,००,०००/- (दोनशे लक्ष) लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| १) प्र.क्र.४१ क मध्ये उंड्री येथील आंबेकर हॉटेल ते लीटल हार्ट सोसायटी रस्ता कॉंक्रीटीकरण व रुंदीकरण करणे.<br>बजेट कोड :-CE20A1262/SA15-2311 | ५० लक्ष | |
| २) प्र.क्र.४१ क मध्ये उंड्री येथील गणेश मंदिर ते पेंलेस ऑर्चीड रस्ता सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे.(१.५ कि.मी.)<br>बजेट कोड :- CE20A1262/SA15-2312 | ५० लक्ष | |
| ३) प्र.क्र.४१ क मध्ये उंड्री चौक ते वडाचीवाडी रस्ता सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे.(२कि.मी.)<br>बजेट कोड :-CE20A1262/SA15-2313 | ५० लक्ष | |
| ४) प्र.क्र.४१ क मध्ये महंमदवाडी येथील पीरमंदिर जाणारा रस्ता (वसंत घुले ते पीरमंदिर) करणे.<br>बजेट कोड :-CE20A102/SA2-3171 | ३० लक्ष | |
| ५) प्र.क्र.४१ क मध्ये उंड्री येथील गणेश मंदिर ते पेंलेस ऑर्चीड रस्ता सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे (१.५ कि.मी)<br>बजेट कोड :-CE20A1262/SA15-2562 | १० लक्ष | |
| ६) प्र.क्र.४१ क मध्ये उंड्री चौक ते वडाचीवाडी रस्ता सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे.(२ कि.मी.)<br>बजेट कोड :- CE20A1262/SA15-2563 | १० लक्ष | |
| एकूण | --------<br>२००.०० लक्ष<br>--------- | |
| नवीन सुचविलेली कामे - | | |
| १. प्र.क्र.४१ क मध्ये उंड्री येथील आंबेकर हॉटेल ते लीटल हार्ट सोसायटी रस्ता कॉंक्रीटीकरण व रुंदीकरण करणे. | --- | २००.०० लक्ष |

**विषय क्र.२७१**

**मा. श्वेता सचिन घुले व मा.प्राची आशिष अल्हाट यांचे दि.१०/०६/२०२६ चे पत्र.**

प्रभाग क्र.४१ क मधील खालील कामांसाठी रुपये ६०,००,०००/- (साठ लक्ष) लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| १.४१ क मधील नवीन समाविष्ट गावामध्ये सार्वजनिक शौचालय उभारणे. (बजेट कोड FE14A105/SG2-565 पान क्र.२९०)<br>२.४१ क मधील नवीन समाविष्ट गावामध्ये सार्वजनिक शौचालय उभारणे. (बजेट कोड FE14A105/SG2-644 पान क्र.२९१) | ५०.०० लक्ष<br>१०.०० लक्ष | |
| एकूण | ६०.०० लक्ष | |
| <u>नवीन सुचविलेले काम</u><br>१) ४१ क मधील उंड्री येथील गोदरेज होरेईझोन शेजारील ॲमिनीटी स्पेस मध्ये उद्यं विकास करणे . | | ६०.०० लक्ष |

**विषय क्र.२७२**

**मा. दत्तात्रय रंगनाथ बहिरट व मा.सुहास विजय टिंगरे यांचे दि.११/०६/२०२६ चे पत्र.**

प्रभाग क्र.७ ड:

दिनांक २० एप्रिल २०२६ रोजीच्या मुख्यसभेसाठी पुणे मनपासाठी वर्षानुवर्षे सेवा देत असलेल्या सर्व १०,५२४ कंत्राटी कामगारांच्या ESI आणि बोनसबाबत मी दिनांक १/४/२०२६ रोजी विचारलेल्या प्रश्न क्रमांक ३५ संदर्भानुसार,

पुणे मनपासाठी वर्षानुवर्षे सेवा देत असलेल्या सर्व १०,५२४ कंत्राटी कामगार आहेत. २१०००/- पेक्षा जास्त वेतन असल्याने मनपा कंत्राटी कामगारांना ESI योजनेचा लाभ मिळत नाही हि वस्तुस्थिती आहे. एकंदरीतच आपल्या सर्वांचे आणि पुणेकरांचे आरोग्य राखण्यासाठी दररोज आपले अंगण, संपूर्ण पुणे शहर स्वच्छ करणारे, आपले स्वतःचे आरोग्य धोक्यात घालून कोविड काळात देखील काम केलेल्या आणि वर्षानुवर्षे पुणे मनपासाठी सेवा देणाऱ्या कष्टकरी, आर्थिक दुर्बल कंत्राटी कामगारांना आणि त्यांच्या कुटुंबाला आरोग्य सुविधा देण्यासाठी पुणे मनपाने पुढाकार घ्यावा.

सर्व कंत्राटी कामगरांसाठी १) स्वर्गीय अजितदादा पवार शहरी गरीब आरोग्य योजनेत विशेष तरतूद करून त्यात आवश्यक बदल करून जो व्यक्ती पुणे मनपामध्ये कंत्राटी कर्मचारी म्हणून काम करत आहे त्यास व त्याच्या कुटुंबाला (पत्नी, मुले आणि आई-वडील) पुणे मनपा पॅनेलवर असलेल्या रुग्णालयांत १००% पूर्णतः मोफत उपचार मिळतील अथवा २) पुणे मनपातील सर्व कंत्राटी कामगरांना पुणे मनपा पॅनेलवर असलेल्या रुग्णालयांत १००% पूर्णतः मोफत उपचार मिळतील अशी योजना सुरु करावी अथवा ३) पुणे मनपातील सर्व कंत्राटी कामगरांना पुणे मनपाच्या अंशदायी सहाय्य योजनेचे सभासदत्व तातडीने देण्यात यावे.

तसेच पुणे मनपातील सर्व कंत्राटी कामगरांना बोनस मिळावा यासाठी बोनस प्रदान अधिनियम, १९६५ नुसार बोनससाठी असलेली प्रतिमाह २१०००/- रुपयांची वेतन मर्यादा प्रतिमाह ३५०००/-रुपयांपर्यंत वाढवावी यासाठी मे. शासनाकडे तशी मागणी करावी.

**विषय क्र.२७३**
**मा. संदिप बाळासाहेब बेलदरे व मा.डॉ.दादा कोद्रे यांचे दि.११/०६/२०२६ चे पत्र.**

प्रभाग क्र. ३८ येथील दत्तनगर-टेल्को कॉलनी मधील ॲमिनीटी स्पेस सर्वे नंबर 5 मध्ये, (MH19) हॉस्पिटलसाठी अंदाजे आरक्षित (1.5 एकर) जागा महानगरपालिके च्या ताब्यात आहे. सदर जागेवर बानेर येथे ppp तत्वावर विकसित केलेल्या हॉस्पिटलच्या धर्तीवर आंबेगाव बुद्रुक येथील जागेवर सुसज्ज हॉस्पिटल विकसित करण्यात यावे. ह्या हॉस्पिटलसाठी मान्यता मिळावी.

**विषय क्र.२७४**
**मा. संदिप बाळासाहेब बेलदरे व मा.डॉ.दादा कोद्रे यांचे दि.११/०६/२०२६ चे पत्र.**

प्रभाग क्र. ३८ येथील स्वामीनारायण टेकडी येथे मोठ्या प्रमाणावर वृक्ष संपदा-पक्षी-वाणी प्राणी (झाडे) आहेत. तेथे ऊन्हाळ्यात वृक्षांसाठी पाणी नसल्यामुळे बरेचशी वृक्ष सुकतात ह्या वृक्षांना पाणी देण्यासाठी जांभूळवाडी तलाव येथून स्वामीनारायण टेकडी येथे नवीन पाण्याची टाकी, पाण्याची पाइप लाइन, मोटर बसवण्यासाठी मान्यता मिळावी.

## <u>माहितीसाठी आलेले विषय</u>

**विषय क्र.२७५**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.५ यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६/०४/२०२६ ते दि.३०/०४/२०२६ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) नुसार मा. अति. महा. आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.५/१५२, दि.०३/०६/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.२७६**

दिनांक २५/०५/२०२६ ते ३१/०५/२०२६ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ४६ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/१५७, दि.०५/०६/२०२६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

## <u>ठरवान्वये आलेले अभिप्राय</u>

**विषय क्र.२७७**

सॅन ॲड्स औंध पुणे ह्या जाहिरातक्षेत्रात काम करणाऱ्या कंपनीला उपलब्ध असणाऱ्या महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये मुख्य रस्त्यालगत ५० ठिकाणी अद्ययावत शौचालय महानगरपालिकेसाठी मोफत बांधण्यासाठी, त्यावरील जाहिरात हक्क व जागेसाठी २० वर्षाकरिता करार करण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचा जा.क्र. मआ/घ.क.व्य.का./१५८, दि.०८/०६/२०२६ चा अभिप्राय विचारासाठी.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. २७८**

**मा. महेश नानासाहेब वाबळे यांचे १३/०५/२०२६ चे पत्र.**

प्रभाग क्र.३६ड मध्ये विविध विकास कामे करणे करीता खालील प्रमाणे र.रु.२० लक्षांचे वर्गीकरण करून मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करणे बाबत

| अ.क्र. | कामे | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १. | पुणे मनपा सन २०२६-२७ अंदाजपत्रक बजेट कोड CE12A422/SJ2-1370 प्रभाग क्र.३६ड मध्ये वि.स.खांडेकर शाळेत स्वच्छता विषयक कामे करणे. | १० लक्ष | |
| २. | पुणे मनपा सन २०२६-२७ अंदाजपत्रक बजेट कोड CE12A422/SJ2-1371 प्रभाग क्र.३६ड मध्ये राजीव गांधी ई-लर्निगस्कूल येथे स्वच्छता विषयक कामे करणे. | १० लक्ष | |
| | नवीन कामाचे नाव | | |
| १. | प्रभाग क्र.३६ ड मध्ये ड्रेनेज दुरुस्ती व साफसफाईची कामे लेबर मार्फत करून घेणे. | | २० लक्ष |

**(टीप : सदरील विषयाचा विचार एक महिना नंतर करण्यात यावा, असे दि.१४/०५/२०२६चे सभेत ठरले होते.)**

**विषय क्र. २७९**

**मा. महेश नानासाहेब वाबळे यांचे १३/०५/२०२६ चे पत्र.**

प्रभाग क्र.३६ ड मध्ये विविध विकास कामे करणे करीता खालील प्रमाणे र.रु.४० लक्षांचे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करणे बाबत.

| अ.क्र. | कामे | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १. | पुणे मनपा सन २०२६-२७ अंदाजपत्रक बजेट कोड CE20A1262/SA15-2555 प्रभाग क्र.३६ ड मध्ये पूजा नर्सिंग होम येथील रस्ता कॉंक्रीटी करणे. | ४० लक्ष | |
| **नवीन सुचविलेली कामे** | | | |
| १. | प्रभाग क्र.३६ ड मध्ये पूजा नर्सिंग होम परिसरात विविध विषयक व दुरुस्ती विषयक कामे करणे | | २० लक्ष |
| २. | प्रभाग क्र.३६ड मध्ये सहकारनगर २ मध्ये व विविध ठिकाणी रस्ते विषयक कामे करणे व दुरुस्ती करणे. | | २० लक्ष |

**(टीप : सदरील विषयाचा विचार एक महिना नंतर करण्यात यावा, असे दि.१४/०५/२०२६चे सभेत ठरले होते.)**

**विषय क्र. २८०**

**मा. महेश नानासाहेब वाबळे यांचे १३/०५/२०२६ चे पत्र.**

प्रभाग क्र.३६ ड मध्ये विविध विकास कामे करणे करीता खालील प्रमाणे र.रु.४० लक्षांचे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करणेबाबत

| अ.क्र. | कामे | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १. | पुणे मनपा सन २०२६-२७ अंदाजपत्रक बजेट कोड CE20A1262/SA15-2556 प्रभाग क्र.३६ ड मध्ये गवळी वाडा रस्ते कॉक्रीटी करण करणे. | ४० लक्ष | |
| **नवीन सुचविलेली कामे** | | | |
| १. | प्रभाग क्र.३६ ड मध्ये गवळी वाडा परिसर रस्ते विषयक व दुरुस्ती कामे करणे | | २० लक्ष |
| २. | प्रभाग क्र.३६ड मध्ये सातव हॉल परिसरात रस्ते व दुरुस्ती विषयक कामे करणे. | | २० लक्ष |

**(टीप : सदरील विषयाचा विचार एक महिना नंतर करण्यात यावा, असे दि.१४/०५/२०२६चे सभेत ठरले होते.)**

**विषय क्र.२८१**

**मा.निलेश निकम, विरोधी पक्षनेता व मा. दत्ता धनकवडे यांचे दि.१२/०५/२०२६ चे पत्र.**

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील वृक्षगणना करणे कामी प्रशासनाने में सारा आय.टी या कंपनीला २९.८७ कोटी रुपयाची निविदा मान्यतेसाठी चे विषयपत्र तयार केले आहे. पुणे शहरातील वृक्षगणना २०१७ या आर्थिक वर्षात सुरु करून २०२४ या साली पूर्ण झालेली आहे. त्या गणनेनुसार पुणे शहरात ५८ लाख वृक्ष आहेत. तसेच २०१७ ते २०२६ या कालवधीत किती वृक्ष काढण्यासाठी परवानगी दिली याच्या सर्व नोंदी वृक्ष प्राधिकरण विभागाकडे उपलब्ध आहेत. तसेच या कालवधीत नव्याने केलेल्या वृक्ष लागवडीच्या नोंदी सुध्दा या विभागाकडे उपलब्ध आहेत. त्यामुळे फक्त २०१७ नंतर नव्याने समाविष्ठ झालेल्या गावांतील वृक्षगणना करावी.

मे सारा आय.टी या कंपनीने मिळकतकर विभागाने जी आय, एस मॅपिंगचे कामामध्ये ८८% चुका केल्या आहेत तसेच या कंपनीच्या २ कर्मचारी यांच्या वर बनावट स्वाक्षरी प्रकरणी मनपाने गुन्हा दाखल केलेला आहे व कंपनीला ब्लॅक लिस्ट करून त्यांचे १२.०० कोटी रुपये जप्त केलेले आहेत. या बाबींचा विचार करून मे. सारा आय.टी कंपनीची वृक्षगणनेची निविदा रद्द करून फक्त नव्याने समाविष्ठ गावांसाठी वृक्षगणना करणे कामी नव्याने निविदा मागविण्यात यावी.

**(टीप : सदरील विषयाचा विचार आचारसंहिते नंतर करण्यात यावा, असे दि.२७/०५/२०२६चे सभेत ठरले होते.)**

**विषय क्र.२८२**

प्रभाग क्रमांक १९ मध्ये बाफना मोटर्स काशेवाडी १० नं. कॉलनी परिसरात व बीएसएनएल ऑफिस पर्यंत रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे SHREE BHAVANI CONSTRUCTION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५२५७२६११/- पेक्षा २.०१% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५१५१५९०१=५२ अधिक जी.एस.टी. र.रु.९२७२८६२/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.४५१३८४/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.४७१७००/- पर्यंत अशी एकुण र.रु.६१७११८४७=५२ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/८८, दि.१३/०५/२०२६ चे पत्र.

**(टीप: सदरील विषयाचा विचार आचारसंहिते नंतर करण्यात यावा, असे दि.२७/०५/२०२६चे सभेत ठरले होते.)**

**विषय क्र.२८३**

प्रभाग क्र.३१ मधील स.नं. ९ कर्वे नगर मधील प्ले ग्राउंड आरक्षित जागेवर अर्चरीचे मैदान विकसित करणे, या कामासाठी चालू वर्षातील ८२.५० लक्ष व्यतिरिक्त पुढील सन २०२७-२८ मध्ये रक्कम रुपये ४९२.५० लक्ष (स्थापत्य व विद्युत कामासाठी) पर्यंत अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध करणे त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चाचे दायीत्व स्विकारण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील १९४९ चे कलम ७२ (ब) अन्वये मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभा यांची मान्यता मिळणेबाबत. मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन /१०५, दि. १४/५/२०२६ चे पत्र.
**(टीप : सदरील विषयाचा विचार आचारसंहिते नंतर करण्यात यावा, असे दि.२७/०५/२०२६चे सभेत ठरले होते.)**

**विषय क्र. २८४**

**मा. निलेश कोंढाळकर व मा. अल्पना गणेश वरपे यांचे दि. १८/०५/२०२६ चे पत्र**

मी श्री स्वामी समर्थ एज्युकेशन फाऊंडेशन ही संस्था गेली १६ वर्षे शैक्षणिक संस्था म्हणून पुणे भागात कार्यरत आहे, तसेच ही संस्था सामाजिक क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात काम करत आहे, पण सध्याचे परिस्थिती पाहता मुले आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित रहित आहे आणि या घटकांचा विचार करून ही संस्था या मुलांकरता रात्र शाळा / कॉलेजसाठी आपणाकडे बावधन भागातील स्वामी विवेकानंद ई लर्निंग स्कूल बावधन ही पुणे महानगरपालिकेची शाळा आपणाकडे ६ वर्ग खोल्या ८५ विद्यार्थ्यांसाठी ३० वर्षे भाडेतत्वावर मिळण्याकरिता विनंती पूर्वक मागणी करीत आहे.

तरी श्री स्वामी समर्थ एज्युकेशन फाऊंडेशन या संस्थेला स्वामी विवेकानंद ई लर्निंग स्कूल बावधन ही शाळा रात्र शाळा व कॉलेज साठी भाडे तत्वावर चालवण्यासाठी मान्यता द्यावी ही विनंती.
**(टीप : सदरील विषयाचा विचार आचारसंहिते नंतर करण्यात यावा, असे दि.२७/०५/२०२६चे सभेत ठरले होते.)**

**विषय क्र. २८५**

**मा. पुजा प्रतुल जागडे व मा. निशा सचिन मानवतकर यांचे दि. २२/०५/२०२६ चे पत्र**

कल्याण स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्थेला पुणे महानगरपालिका अंतर्गत रुपये ३ लाख पर्यंतचे कामे विना निविदा मिळावी व याचा ठराव मंजूर करून द्यावा ही विनंती.
**(टीप : सदरील विषयाचा विचार आचारसंहिते नंतर करण्यात यावा, असे दि.२७/०५/२०२६चे सभेत ठरले होते.)**

**विषय क्र. २८६**

**मा. अमोल बालवडकर व मा. सुहास टिंगरे यांचे दि. २७/०५/२०२६ चे पत्र**

पुणे शहरामध्ये निर्माण झालेली कार पार्किंग समस्या पाहता शहरामध्ये विविध ठिकाणी आधुनिक मल्टी लेवल कार पार्किंग स्थळाची गरज आहे.

छत्रपती संभाजी महाराज उद्यान, जंगली महाराज रस्ता येथील जुने व वापरासाठी अयोग्य असलेले मल्टी लेवल पार्किंग स्थळ वापरासाठी पाडण्याचा प्रशासन नियोजन करत आहे.

तरी सदर जागेवर पुन्हा नव्याने आधुनिक Multi level Car Parking स्थळ P.P.P. धोरणानुसार उभारणे ही काळाची गरज आहे.

**(टीप: सदरील विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि.११/०६/२०२६चे सभेत ठरले होते.)**

**विषय क्र.** २८७

पुणे महानगरपालिका व स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था यांचे संयुक्त विद्यमाने "झिरो वेस्ट कसबा-भवानी " प्रायोगिक तत्वावरील प्रकल्पास ३ महिने मुदत वाढ मिळणेस मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घकव्यका/१४०, दि. २६/०५/२०२६ चे पत्र.

**(टीप: सदरील विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि.११/०६/२०२६चे सभेत ठरले होते.)**

## <u>संकीर्ण</u>

**विषय क्र.** २८८

घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कचरा प्रक्रिया प्रकल्प चालक मे. भूमी ग्रीन एनर्जी यांनी भागीदारी संस्थेचे स्वरूप बदलून मर्यादित दायित्व भागीदारी (एलएलपी) करून नावात मे. भूमी ग्रीन एनर्जी एनव्हारोकेअर एलएलपी असा बदल केल्याने मे.भूमी ग्रीन एनर्जी एनव्हारोकेअर एलएलपी या नावाने त्यांचे सोबत सुधारित करारनामा करणेस, सदर ठेकेदाराने केलेल्या कामाची होणारी देयके मे. भूमी ग्रीन एनर्जी एनव्हारोकेअर एलएलपी या नावाने अदा करणेस खालील बाबींस मान्यता घेणेबाबत. मा. महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मआ/घनकचरा/११८ दि. १८/०५/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.** २८९

पुणे महानगरपालिकेच्या मिळकतीमध्ये अशासकीय/सामाजिक/स्वयंसेवी संस्था व पुणे मनपा (समाज विकास विभाग) यांच्या संयुक्त सहकार्याने डॉ.दळवी हॉस्पिटल नरवीर तानाजीवाडी, शिवाजीनगर, पुणे -०५ या ठिकाणी विशेष दिव्यांगांसाठी थेरपी उपक्रम राबविणेकरीता संस्था निवड करणे कामी मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा. क्र.मआ/समाजविकास/१७०, दि. १०/०६/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.** २९०

आरोग्य खात्याकडे करार पद्धतीने एकवट वेतनावर विविध संवर्गातील पदांच्या सेवकांना मुदतवाढ मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा. क्र.मआ/आरोग्य/१७५, दि. ११/०६/२०२६ चे पत्र.

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**